परीक्षा व मूल्यमापन मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
दूरध्वनी क. (०२०) २५६२ १३९८
Website: www.unipune.ac.in

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**Savitribai Phule Pune University**
*(Formerly University of Pune)*

**Board of Examinations & Evaluation**
Ganeshkhind, Pune – 411 007
Telephone: (020) 2562 1398
E-mail: coe@unipune.ac.in

**संदर्भ क्र.:** परीक्षा/छावता/ ३९८ **दिनांक :** ०५/०३/२०२६

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
प्रस्तुत विद्यापीठ
(पुणे, अहिल्यानगर, नाशिक जिल्हा व दादरा-नगर हवेली)

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये राज्यातील अतिवृष्टी व पूर आपत्तीग्रस्त तालुक्यातील सर्व विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफीची सवलत अनुज्ञेय करणेबाबत.**

संदर्भ : शासन परिपत्रक कमांक : संकीर्ण २०२५/ई.प्र.क्र.१३९२२२९/मशि–२, दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/शिष्य–२०२५–२६/वि.स.अता.प्र.क्र.१९६२३/E–२६७६३८९, दिनांक ०३/०३/२०२६ सोबत प्राप्त शासन परिपत्रक कमांक संकीर्ण २०२५/ई.प्र.क्र.१३९२२२९/मशि–२, दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ सोबत जोडलेला असून सदर परिपत्रकाचे अवलोकन करावे. या परिपत्रकानुसार आपल्या स्तरावर काही कार्यवाही झाली असेल तर त्या माहितीच्या आधारे सदर शासन परिपत्रकान्वये अतिवृष्टी व पूर आपत्तीग्रस्त परिस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांमध्ये विद्यापीठाअंतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची परीक्षा फी माफीची सवलत अनुज्ञेय केली आहे. याबाबत कोणतीही कार्यवाही अद्याप झाली नसल्यास त्यानुसार सर्व संबंधिताना पुढील तात्काळ कार्यवाहीसाठी निर्देशित करण्यात येत आहे.

सबब, उपरोक्त विषय व संदर्भिय परिपत्रकास अनुसरुन सर्व संबंधिताना या पत्राद्वारे कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रामध्ये नमूद निर्देशानुसार परीक्षा शुल्काबाबतची आवश्यक ती कार्यवाही करावी आणि कोणत्याही परिस्थतीत अतिवृष्टी व पूर आपत्तीग्रस्त तालुक्यातील पात्र विद्यार्थी सदर योजनेपासून वंचित राहणार नाहीत, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. खाली नमूद केलेल्या लिंकवरील माहिती दिनांक ०६ मार्च, २०२६ दुपारी १२.०० ते दिनांक ९ मार्च, २०२६ पर्यंत भरण्यात यावी.

लिंक : examinward.unipune.ac.in

कळावे,

आपला,

(प्रा. डॉ. प्रभाकर देसाई)
प्रभारी संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

सोबत : वरीलप्रमाणे.

**सन २०२५ मध्ये राज्यातील अतिवृष्टी व पूर आपत्तीग्रस्त तालुक्यातील सर्व विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफीची सवलत अनुज्ञेय करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण २०२५/ई.प्र.क्र.१३९२२२९/मशि-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ११ फेब्रुवारी, २०२६

**संदर्भ** :-

(१) शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र. एचईडी-१५९२/१२०२/(११३२)/ताशि-५ दि. १८.१०.१९९३

(२) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. सीएलएस-२०२५/प्र.क्र.३६५/म-३ (मदत-१) दि. १०.१०.२०२५

**प्रस्तावना :-**

संदर्भाधीन क्र. १ येथील शासन निर्णयान्वये राज्यातील टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना अकृषी विद्यापीठे, परीक्षा मंडळे व सर्व महाविद्यालयांची परीक्षा फी माफीची योजना कार्यान्वित आहे. संदर्भाधीन क्र. २ येथील शासन निर्णयान्वये महसूल व वन विभागाने सन २०२५ मध्ये राज्यातील अतिवृष्टी व पूर आपत्तीग्रस्त तालुके घोषित करुन या तालुक्यातील आपदग्रस्त बाधितांना दुष्काळ सदृष्य परिस्थितीत लागू असणाऱ्या सवलती अनुज्ञेय केल्या आहेत. त्यानुसार या सवलती उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिनस्त सर्व विद्यार्थ्यांना अनुज्ञेय करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक** :-

संदर्भाधीन क्र. २ येथील शासन निर्णयान्वये महसूल व वन विभागाने घोषित केलेल्या तालुक्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिनस्त सर्व विद्यार्थ्यांना दुष्काळ सदृष्य परिस्थितीत अनुज्ञेय असलेली अकृषी विद्यापीठे, परीक्षा मंडळे व सर्व महाविद्यालयांची परीक्षा फी माफीची सवलत अनुज्ञेय करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर सवलत सन २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षाकरिता लागू राहील.

३. प्रस्तुत प्रयोजनार्थ आवश्यकतेनुसार वित्तीय तरतूद उपलब्ध करण्याची कार्यवाही संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे यांनी करावी.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२६०२१११७५६५६३६०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

HEMANT S PATHAK

Digitally signed by HEMANT S PATHAK
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT,
[illegible], postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=[illegible], cn=HEMANT S PATHAK
Date: 2026.02.11 17:57:42 +05'30'

( हे. सु. पाठक )

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण), यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
३. मा. अपर मुख्य सचिव, (उ.व.तं.शि.विभाग), मंत्रालय, मुंबई
४. मा. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
५. संचालक, उच्च शिक्षण / तंत्र शिक्षण / कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य.
६. सर्व सहसचिव /उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सर्व विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण / तंत्र शिक्षण
८. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
९. महालेखापाल,(लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र राज्य,मुंबई/नागपूर,
१०. महालेखापाल,(लेखापरीक्षा),महाराष्ट्र राज्य,मुंबई/नागपूर,
११. निवड नस्ती (मशि-२).